# जाऊ दे, होतेय ते ठीकच आहे

‘असे का झाले’ विचार करून काही उपयोग नाही पोरी
आता नाही फरक पडणार काही
‘असे का झाले’ विचार करून काही फायदा नाही पोरी
हे अजून तुझ्या ध्यानात आले नाही?

तुझा कोंबडा जेंव्हा भल्या पहाटे आरवेल
तू खिडकीतून पाहाशील तेव्हा मी गेलोय तुला दिसेल
तुझ्यामुळेच तर मी प्रवास चालू ठेवतोय जसा जमेल
पण नको पुन्हा विचार करू, होतेय ते ठीकच आहे - १ -

तुझा तो दिवा आता पेटवून काहीच उपयोग नाही मुली
जो मी पूर्वी कधीच नाही पाहिला
तुझा तो दिवा आता पेटवून काहीच फायदा नाही मुली
तो उजेड मजपर्यंत पोचणार नाही कळतेय का तुला?

तरी वाटतं तू काही करायला हवं होतंस वा बोलायला!
माझं मन वळवून हवं होतंस मला थांबवायला
पण आपण कधी बोलल्याचं आठवतच नाही मला
जाऊ दे पुन्हा विचार नको, होतेय ते ठीकच आहे - २ -

मला पुकारण्यात आता काहीच फायदा नाही, पोरी
पूर्वी तरी तू कुठे मला घातली होतीस साद?
आता मला हाका मारून काय उपयोग आहे, पोरी
आता ऐकू येत नाही मला तुझा नाद

चालत असताना विचार करतो अन नवल वाटते मला
मी प्रेम केले एका स्त्रीवर, जी होती एक अल्लड बाला
माझे हृदय अर्पिले पण माझे स्वत्वच हवे होते तिला!
पण नको पुन्हा विचार करू, होतेय ते ठीकच आहे - ३ -

अगं एक लांबलचक निर्जन रस्ता तुडवतोय मी
ठाऊक नाही तो कुठे नेईल
अंतिम निरोपाचे शब्द नको वाया घालवूस पोरी
मी एवढंच म्हणेन की तुझे भले होईल

असे नाही म्हणत की वाईट वागणूक दिलीस मला
याहून बरी वागू शकली असतीस! पण जाऊ दे चला
एव्हढेच की माझा अमूल्य वेळ मात्र वाया गेला!
पण नको पुन्हा विचार करू, होतेय ते ठीकच आहे - ४ –

"Don't Think Twice, It's All Right" by Bob Dylan
Translated by Abhay B. Joshi and Milind A. Toro